# Expression of Interest (EOI)

## फळे व भाजीपाला फिरते विक्री केंद्र शीतचेंबरच्या सुविधेसह (Mobile Vending Cart - Platform with cool chamber) या घटकाचा रेखांकन आराखडा व अंदाजपत्रक

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळामार्फत एकात्मिक फलोत्पादन अभियान योजना - अंतर्गत फळे व भाजीपाला विक्री करीता इच्छुक उत्पादक व पुरवठादार कंपन्यांकडून फळे व भाजीपाला फिरते विक्री केंद्र शीतचेंबरच्या सुविधेचे (Mobile Vending Cart - Platform with cool chamber) रेखांकन आराखडा व अंदाजपत्रकाचे प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यात येत आहेत. प्रस्ताव सादर करणेकरीता अटी, शर्ती व इतर तपशील कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुषंगाने या घटकरीता उत्पादक व पुरवठादारांनी info@mahanhm.in या ई-मेल आयडीवर दि. ३१ ऑगस्ट २०२३ प्रस्ताव सादर करावेत.

स्वाक्षरीत/-
(डॉ. के.पी.मोते)
**संचालक**
**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि**
**औषधी वनस्पती मंडळ, पुणे**

**फळे व भाजीपाला फिरते विक्री केंद्र शीतचेंबरच्या सुविधेसह (Mobile Vending Cart - Platform with cool chamber) या घटकाकरीता सुयोग्य असे रेखांकन आराखडा व अंदाजपत्रक सादर करण्याकरीता अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.**

१. उत्पादक / पुरवठादाराकडे उद्योग आधार / उद्यम नोंदणी / शॉप ॲक्ट प्रमाणपत्रासह TIN आणि PAN नंबर असणे आवश्यक.
२. उत्पादक / पुरवठादाराकडे GSTN ची नोंदणी असणे आवश्यक.
३. उत्पादक / पुरवठादाराने सदर घटकाच्या मॉडेलबाबत ५०० रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर गॅरंटी (१ वर्षाकरीता), वारंटी (३ वर्षाकरीता) व देखभालीबाबत हमीपत्र देणे आवश्यक.
४. उत्पादक / पुरवठादाराने अटी व शर्ती मान्य असलेबाबत आणि काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे स्वः घोषणा पत्र देणे आवश्यक.
५. उत्पादकानी स्थानिक भाषेमध्ये तपशीलवार देखभाल पुस्तिका पुरवठ्याच्यावेळी देणे आवश्यक.
६. यासोबत निकषानुसार फिरते विक्री केंद्राचे रेखांकन आराखडा व अंदाजपत्रक सादर करण्यात यावे.
७. याच्या आधारे महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ स्तरावर कृषि विद्यापीठ शास्त्रज्ञांचा समावेश असणा-या समितीमार्फत उत्पादक व पुरवठादारांची प्राथमिक निवड करण्यात येईल.
८. निवड करण्यात आलेल्या उत्पादक पुरवठादारांना फिरते विक्री केंद्र शीतचेंबरसह याचा प्रत्यक्ष नमुना उपरोक्त समितीस सादरीकरण करणे आवश्यक राहील.
९. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ स्तरावर कोणत्याही स्वरूपाची खरेदी प्रस्तावित नाही.
१०. उत्पादक / पुरवठादारांनी फळे व भाजीपाला फिरते विक्री केंद्र शीतचेंबरच्या सुविधेसह (Mobile Vending Cart - Platform with cool chamber) या घटकाकरीता महाडीबीटी प्रणालीद्वारे निवड झालेल्या शेतक-यांना संपर्क करून निश्चित आरेखनानुसार गुणवत्ता पुर्ण पुरवठा करणे अपेक्षित आहे.
११. योजनेअंतर्गत देय अनुदान संबंधित शेतक-यांना महाडीबीटी प्रणाली अंतर्गत निश्चित कार्यप्रणालीनुसार थेट वर्ग करण्यात येईल.
१२. शेतक-यांना विक्रीत्तोर सेवा देणे उत्पादक / पुरवठादारास बंधनकारक राहील.

## परिशिष्ट - १

उत्पादक / पुरवठादार यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उत्पादक / पुरवठादार यांच्या कंपनीचे नाव | | |
| २ | कंपनी नोंदणी क्र. व दिनांक | | |
| ३ | कंपनीचा पत्ता | | |
| ४ | कार्यालयाचा पत्ता | | |
| ५ | कंपनीचा संपर्क क्र.<br>ई- मेल आयडी<br>संकेतस्थळ (असल्यास) | | |
| ६ | कंपनीचा प्रकार | स्व:मालकी / भागीदारी / खाजगी / सार्वजनिक | |
| ७ | कंपनीची वर्गवारी | सुक्ष्म / लघु / मध्यम / मोठे उदयोग | |
| ८ | कंपनीचे उद्योग आधार / उद्यम नोंदणी / | | |
| ९ | कंपनीच्या शॉप ॲक्ट प्रमाणपत्र | | |
| १० | TIN Number | | |
| ११ | PAN Number | | |
| १२ | GSTN/DIN/DPIN | | |
| १३ | कंपनीने प्राधिकृत केलेल्या अधिकृत व्यक्तीचा तपशील | | |
| १४ | गुणवत्ता नियंत्रणाकरीता कंपनीने प्राधिकृत केलेल्या अधिकृत व्यक्तीचा तपशील | | |
| १५ | फळे व भाजीपाला फिरते विक्री केंद्र शीतचेंबरच्या सुविधेसह (Mobile Vending Cart - Platform with cool chamber) या घटकाचा रेखांकन आराखडा (डिझाईन) सोबत जोडावे | | |
| १६ | फळे व भाजीपाला फिरते विक्री केंद्र शीतचेंबरच्या सुविधेसह (Mobile Vending Cart - Platform with cool chamber) या घटकाचे अंदाजपत्रक (कोटेशन) जोडावे | | |

**आवश्यक कागदपत्रे सोबत जोडलेली असून उपरोक्त माहिती बरोबर असल्याची मी खात्री केली असून सदर माहिती खोटी / चुकीची आढळून आल्यास माझा / आमचा प्रस्ताव कोणत्याही स्तरावर रद्द होईल व मी कायदेशीर पात्र राहील याची मला जाणीव आहे.**

**दिनांक :-**
**वेळ:-**

**अधिकृत स्वाक्षरी**

**कंपनीचे नाव व शिक्का**

# मार्गदर्शक सुचना

- **स्थाई / फिरते / विक्री केंद्र – शित चेंबरच्या सुविधेसह**

**(Static / Mobile Vending Cart / Platform with Cool Chamber)**

| | |
|---|---|
| अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च | रु. ३००००/- |
| देय अनुदान | ग्राहय भांडवली खर्चाच्या ५० टक्के |

ग्राहकांच्या सुविधेसाठी लोकवस्तीमध्ये / लोकवस्ती जवळ कमी खर्चाचे स्थाई / फिरते भाजीपाला विक्री हातगाडी / केंद्र स्थापन करुन योग्य दरामध्ये आणि आवश्यक त्या वेळेस ग्राहकांना फळे व भाजीपाला पुरविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेमध्ये कुलचेंबरच्या सुविधेसह हातगाडी, विक्री कट्टा, वजनकाटे, इ. भांडवली खर्च अनुदानासाठी ग्राहय धरला जाईल.

- **अर्थसहाय्याचे स्वरूप :-**

कुल चेंबरच्या सुविधेसह स्थाई / फिरते / विक्री केंद्र येणा-या खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १५०००/- इतके अनुदान देय राहील. काम पूर्ण होवून प्रकल्प कार्यान्वीत झाल्याची खात्री झाल्यावर अनुदान अदा करण्यात येईल.

- **पात्र लाभार्थी :-**

वैयक्तीक लाभार्थी, स्वयंसहाय्य महिला / पुरुष बचत गट, उत्पादकांच्या सहकारी संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृतकंपन्या इत्यादी.